# आदेश नि.क्र.०४ वर

## (दि. २०/०५/२०२२)

**१.** अर्जदाराने कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (थोडक्यात 'कायदा') अन्वये सदरहू अर्ज गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराला नोटीस प्राप्त झाल्यानंतर ते त्यांच्या वकीलांमार्फत हजर झाले. त्यांनी लेखी जबाब नि.क्र.०९ वर दाखल केले. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ श्रीमती पी. आर. गोवणे यांनी लेखी युक्तीवाद नि.क्र.१२ प्रमाणे दाखल केले. गैरअर्जदाराचे विद्वान विधीज्ञ श्री व्ही. बी. भोसे यांना ऐकले, अर्जाची व लेखी जबाबाची पाहणी केली. त्यामुळे खालील प्रश्नबिंदु विचारार्थ उपस्थित झाले.

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे ती प्रथम दृष्टया सिध्द करते काय ? | नाही |
| २ | अर्जदार ही कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ प्रमाणे गैरअर्जदारापासुन संरक्षण व त्यांच्या कडुन अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहे काय ? | नाही |
| ३. | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येते |

**प्रश्नबिंदु क्र. १**–

२. सर्वात आधी येथे हे नमुद करणे गरजेचे आहे की, सदर अर्ज कौटुंबिक हिसांचारातुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत दाखल करण्यात आले असुन कौटुंबिक हिंसाचार या व्याख्यामध्ये शारीरिक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दिक व भावनिक दुर्व्यवहार आणि आर्थिक दुर्व्यवहार घडवुन आणण्याचा समावेश असतो. त्यामुळे सदरहु अर्जामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदारावर कोणत्या प्रकारचा अत्याचार केल्याचे नमुद केले आहे, त्याची चाचणी करणे आवश्यक आहे. सदरहु अर्जामध्ये सरंक्षण अधिकारी यांचे अहवाल मागविण्यात आले होते ते नि.क्र.१४ वर दाखल आहे. याच बरोबर येथे हे नमुद करणे गरजेचे आहे की, दोन्ही पक्षकारांनी **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी रजनेश –वि– नेहा** या प्रकरणामध्ये दिलेल्या दिशा निर्देशाप्रमाणे आपआपले मालमत्ता व दायित्वा बाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

३. अर्जदार हिने तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार झाल्याबाबत अर्ज शपथपत्रावर दिलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात त्यांच्या नाते संबधाबाबत वाद नाही. अर्जदार व गैरअर्जदार मध्ये मुख्य वाद असा आहे की, गैरअर्जदार क्र.१ ला किडणीचा आजार असल्याने त्याच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्या आहेत व त्याला नेहमी डायलसीस करावे लागते. गैरअर्जदार हे अर्जदार हीला वारंवार असे म्हणत होते की, त्याने गैरअर्जदार क्र.१ चे लग्न तिच्या सोबत या कारणावरुन केले

की, ती गैरअर्जदार क्र.१ ला तिची किडणी देईल. या कारणांवरुन गैरअर्जदार हे अर्जदार हिला मानसीक व शारीरिक त्रास देत होते. त्यामुळे अर्जदार ही आपल्या माहेरी राहत असुन तिने गैरअर्जदारा विरुध्द पो.स्टे. येथे रिपोर्ट सुध्दा दिलेला आहे. अर्जदार हिने गैरअर्जदाराकडुन रुपये २५,०००/– दरमहा अंतरिम खावटी मिळण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात असलेले भांडण हे लक्षात घेवुन जर अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजाची पडताळणी केली तर असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र.१ याच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्याने त्याची आई त्याला तिची किडणी देत असुन त्याबाबत ते वेळोवेळी शासकिय रुग्णालय, नागपुर येथे जावुन त्याबाबत योग्य तो सल्ला व त्या करीता लागणारी चाचणी करीत आहे. त्यासंबधी दस्तऐवज गैरअर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यामुळे किडणी प्रत्यारोपण करीता गैरअर्जदार क्र.१ च्या आईचे नाव शासकिय रुग्णालय, नागपुर येथे देण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ वर लावलेले आरोप की, ते तिला गैरअर्जदार क्र.१ ला किडणी देण्याकरीता मानसीक व शारीरिक त्रास देत होते ही बाब पचण्याजोगी नाही. तसेही गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार हे एकाच गावतील रहिवासी असुन यांचे लग्न हे प्रेमविवाह आहे व ते एकमेकांना लग्नाच्या ११ वर्षाअगोदर

पासुन ओळखत होते तसेच ते एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ची शरीरिक प्रकृती संबधी माहीती अर्जदार हिला असणे अपेक्षीत आहे. म्हणुन लग्नानंतर अर्जदार हिला गैरअर्जदार क्र.१ च्या आजाराबाबत माहीत पडले ही बाब सुध्दा विश्वासार्ह वाटत नाही. तसेच गैरअर्जदारांचे विद्वान विद्यीज्ञ यांनी युक्तिवाद करतांना असे सांगीतले की गैरअर्जदार क्र.१ चे हाताचे दोन्ही आंगठे हे त्याच्या जन्मापासुन नाही हे सुध्दा अर्जदार हीला माहीती होते. तरी सुध्दा तिने गैरअर्जदार क्र.१ सोबत स्वमर्जीने आंतरजातीय प्रेमविवाह केलेला आहे. तिला गैरअर्जदार क्र.१ सोबत विवाह करण्यास कोणीही भाग पाडले नाही. तसेच ते वर्ग १२ वी पासुन एकाच शाळेत शिकत होते. त्यामुळे हया बाबी सुध्दा विश्वासहार्य वाटत नाही की, तिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत फक्त गैरअर्जदार क्र.१ ला तिची किडणी मिळावी म्हणुन करण्यात आले. मुळात जेव्हा अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चे प्रेमविवाह होते तेव्हा तो विवाह त्यांच्या संमतीनेच झाला असावा तिच्यावर कोणी ही हे विवाह करण्यास जबरदस्ती केली नसावी.

५. अर्जदार हिने तिच्यावर गैरअर्जदारांनी कौंटुबीक हिंसाचार तिची किडणी गैरअर्जदार क्र.१ ला मिळावी या करीता केलेला आहे. परंतु गैरअर्जदारांनी दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन असे दिसुन येत की, गैरअर्जदार क्र.१ ला त्याची आई किडणी देत आहे. याकरिता अर्जदाराने त्यांना मदद करणे तर दुरच परंतु या

उलट त्यांचे काही वैद्यकिय दस्ताएवज स्वत: कडे ठेवुन घेतले आहे व त्यांना उपचार घेण्यास अडचण निर्माण केलली आहे. त्यामुळे या कारणांवरुन अर्जदारावर कौटुंबीक हिंसाचार झाला असे प्रथम दृष्टया दिसुन येत नाही. म्हणुन प्रश्नबिंदु क्र.१ ला नकारार्थी उत्तर देण्यात येते.

**प्रश्नबिंदु क्र. २ व ३** :

६. अर्जदाराने गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन म्हणुन शेती असल्याचे व त्यातुन चार लाख रुपये वर्षाकाठी कमवीत असल्याचे नमुद केले आहे. तसेच किराणा दुकानातुन दरमहा दोन लाख रुपये उत्पन्न गैरअर्जदाराला मिळते असे नमुद केले आहे. गैरअर्जदाराने त्याचे मालमत्ता व दायीत्व संबधी शपथ पत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यावरुन असे दिसुन येते की, गैरअर्जदार हा स्वतः आजारी असल्याने तो त्याचा आई वडीलांवर अवलंबुन आहे. याउलट अर्जदार हिने एम.ए., बी.एड पर्यंत उच्च शिक्षण घेतलेले आहे. त्यामुळे ती नौकरी करुन स्वतःचा सांभाळ करु शकते कारण तिने सांगीतल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ च्या दोन्ही किडण्या निकामी झाल्या आहेत व तो डायलसीसवर जिवंत आहे. याचा अर्थ असा की, तो धडधाकट पुरुष नाही, त्यामुळे त्याने अर्जदाराचा सांभाळ करणे हे अपेक्षीत नाही. याबाबत वाद नाही की, अर्जदार हिचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ हा पती असल्याने त्याचीच आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ ची शारीरिक प्रकृती हलाखीची असल्याने व

सध्या त्याचाच जीवनमरणाचा प्रश्न पडल्याने हे अपेक्षीत नाही की, त्याने अश्या अवस्थेत सुध्दा अर्जदाराचा सांभाळ करावा जेव्हा की त्याला या वेळेस सांभाळण्याची व योग्य उपचाराची गरज आहे. म्हणुन अर्जदार अंतरिम खावटी मिळविण्यास पात्र नसल्याने प्रश्नबिंदु क्र.२ ला नकारार्थी उत्तर देवुन प्रश्नबिंदु क्र. ३ ला खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज नि.क्र.०४ नामंजुर करण्यात येतो.

२. सदर आदेशाची प्रत विनामूल्य दोन्ही पक्षांना देण्यात यावी.

NARWADIYA RUPALI CHANDRAKUMAR

Digitally signed by NARWADIYA RUPALI CHANDRAKUMAR
Date: 2022.05.20 13:45:30 +0530

दि.२०/०५/२०२२ (रुपाली .सी. नरवडिया)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वरूड